Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २३ • Title - Code :- MAHMAR4951 • मंगळवार दि.१० ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले पिवळे वादळ



## शिवाजी मोघे यांच्या निषेधार्थ माना जमात्त बांधवांचा भव्य मोर्चा

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर येथे माना जमातीचे वतीने माजी मंत्री शिवाजी मोघे यांनी केलेल्या असंविधानिक वक्तव्याच्या विरोधात माना जमातीच्या वतीने हजारो संख्येने पिवळे वस्त्र, टोपी परीधान करुन हे वादळ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले.

माना जमात ही प्रामुख्याने विदर्भातील जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून माना ही स्वतंत्र आदिवासी जमात आहे. तिची स्वतंत्र धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक परंपरा आहे. केंद्र शासनाच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये माना हि जमात क्रमांक १८ वर नमूद आहे. सन १९५५ मध्ये काका कालेलकर आयोगांनी माना जमातीला अनुसूचित जमातीचे सर्व अधिकार व हक्क बहाल केलेले आहे. मात्र नागपूर येथील आदिवासी क्षेत्रबंधन मुक्ती दिवस निमित्य जाहीर कार्यक्रमात माजी सामाजिक न्यायमंत्री शिवाजी मोघे यांनी आदिवासी माना जमाती बाबत हमारी सरकार आयी तो हायर पॉवर कमिशन नेमो, उसमें गलतीसे जो जो जातीया आयी उसमे जो गलतीसे एन्ट्री आयी है उसमे माना भी है. यह माना भी गलत है, यह गोंड माना उसके लिये है. सब माना के लिए नहीं है यह गलत है इसको निकाल डालो, अशा प्रकारचे असंविधानिक वक्तव्य करून सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या दिनांक ०८/०३/२००६ च्या निर्णया विरुध्द असुन सर्वोच्च न्यायालयाचा अपमान केलेला आहे. माना जमाती संबंधाने वारवार असे वक्तव्य केल्या जात असते. त्यांचे हे विधान केवळ द्वेष भावना आणि आकसापोटी असून संपूर्ण माना जमातीचा अवमान केलेला आहे. त्यामुळे जमाती जमातीत तेढ निर्माण करून अशांतता व संभ्रम निर्माण होत आहे. यावर आळा घालण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यातून १० हजार आदिवासी माना जमातीच्या बांधवांनी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय चिमूर येथे धडक मोर्चा नेऊन निषेध व्यक्त केला. निवेदन देण्यापूर्वी उपस्थितांना आदिवासी माना जमात विद्यार्थी युवा संघटना महाराष्ट्र तालुका शाखा चिमूर ,माना आदिम जमात मंडळ मुंबई तालुका शाखा चिमूर, तसेच समन्वय समितीचे प्रतिनिधीं त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते यांची भाषणे झाली. त्यानंतर प्रतिनिधी शिष्टमंडळांनी अप्पर जिल्हाधिकारी यांना निवेदन देवून शिवाजी मोघे माजी मंत्री यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात यावा. अशी मागणी केली भविष्यात माना जमातीचे विरोधी असे वक्तव्य केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र लढा देण्यात येईल. यासाठी शासन व प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील असा इशारा दिला आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांची महिला व बाल रुग्णालयाला भेट

# माता व बाल मृत्यू दर कमी करण्या करीता उपाययोजना करण्याचे निर्देश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था तत्पर असावी, रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी जिल्हाधिकारी संजय मिना यांनी येथील महिला व बाल रुग्णालयास आकस्मिक भेट देऊन रुग्णालयाची तपासणी केली. भेटी दरम्यान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद खंडाते, महिला व बाल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ. माधुरी किलनाके व रुग्णालयांतर्गत कार्यरत डॉक्टर्स व इतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय प्रशासन, डॉक्टर्स व कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात घ्यावयाच्या काळजीबाबत त्यांनी सूचना दिली. लगतच्या राज्यांतून, जिल्ह्यांवरुन व तालुकास्तरावरुन प्रसुतीरुग्ण संदर्भित होत असल्याने १०० भरती रुग्णसंख्या क्षमता असलेल्या गडचिरोलीच्या महिला व बाल रुग्णालयात २०० ते २५० रुग्ण भरती होत असतात व त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावर ताण पडत असल्याचे वैद्यकीय अधिक्षिका डॉ. माधुरी किलनाके यांनी सांगितले. रुग्णालयाच्या क्षमतेच्या बाहेर जाऊन सुमारे दुप्पट ते अडीच पट रुग्ण रुग्णालयात भरती होत असले तरी अशा परिस्थितीतही रुग्णालयात



पुरेसा औषधी साठा व स्वच्छता असल्याची तसेच महिला व बालरुग्णालय अत्याधुनिक उपकरणे व सुविधा यांनी सज्ज असल्याची जिल्हाधिकारी यांनी खात्री केली.१०० खाटांच्या अतिरिक्त एमसीएच विंगचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित अभियंतांना आदेश दिले. त्या अनुषंगाने वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या मागणीबाबत प्रस्ताव सादर करण्यासंबंधी जिल्हा शल्य चिकित्सक यांना निर्देश दिले. रुग्णालयातील दुसरे मॉड्युलर शल्यक्रिया गृह सुरु करण्याबाबत व निर्जंतुकीकरणाबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना सुचना दिल्यात. डॉक्टरांनी सकाळी व सायंकाळी आणि गरजेप्रमाणे भरती रुग्णांची तपासणी करुन उपचार करावा व तसेच विशेष नवजात काळजी कक्ष ( एस. एन. सी. यु. ) मधील भरती बालकाकडे विशेष लक्ष देण्याबाबत सांगितले. रुग्णालयाचे विद्युत व अग्नी विरोधी उपाययोजनांचे अन्वेषण पूर्ण झालेले असून त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र त्वरीत प्राप्त घेण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिलेत. माता मृत्यू व बाल मृत्यू दर कमी करण्याकरीता सर्व उपाययोजना तसेच सर्व माता मृत्यू व बाल मृत्यू यांचे वेळेत अन्वेषण करुन योग्य त्या उपाययोजना त्वरीत राबविण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले.

## युवकांनी आपल्या संस्कृतीची ओळख बाह्य जगाला करून द्यावी : सीईओ आयुषी सिंह




**गडचिरोली । प्रतिनिधी**

येथील आदिवासी संस्कृती समृद्ध आहे आणि तिचा अभिमान बाळगत मिळालेल्या संधीतून युवकांनी आपल्या संस्कृतीची ओळखबाह्य जगाला करून द्यावी, असा मोलाचा संदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, आयूषी सिंह यांनी युवकांना दिला. नेहरू युवा केंद्र आणि केंद्रीय राखीव पोलिस दल यांच्याद्वारे आयोजित १५ व्या आदिवासी युवा आदान प्रदान कार्यक्रम अंतर्गत ३० युवकांची तुकडी चंदीगडसाठी रवाना करतांना त्या बोलत होत्या.

आयुशी सिंह पुढे म्हणाल्या, आपल्या मनातील मागासलेपणाची भावना अयोग्य असून आपण कुठल्याही गोष्टीत मागे आहोत, असा न्यूनगंड बाळगू नये. त्याचप्रमाणे खरे शिक्षण हे पुस्तकापेक्षा बाह्य जगात जास्त मिळते. त्यामुळे मिळालेल्या प्रवासाच्या संधीचे सोने करावे. आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्प्यांचा उल्लेख करून त्यांनी युवांना मार्गदर्शन केले. ह्या कार्यक्रमाला जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे त्याचप्रमाणे सी.आर.पी.एफ १९२ बटालियन चे अधिकारी नरेंद्र कुमार हे उपस्थित होते. त्यांनी देखील युवकांना मार्गदर्शन केले.नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, भामरागड आणि एटापल्ली तालुक्यातील एकूण २४० आदिवासी युवकांना पोलीस नेहरू युवा केंद्रच गडचिरोली आणि सी. आर. पी. एफ ह्यांच्या माध्यमातून भारतातील विविध ०९ मोठ्या शहरांमध्ये पाठवले जाणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आदिवासी तरुणांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जाणीव करून देणे, विविधतेतील एकतेची संकल्पना आत्मसात करणेच त्यांना विकासात्मक उपक्रम आणि औद्योगिक प्रगतीची जाणीव करून देणे आणि आदिवासी तरुणांना इतर क्षेत्रात प्रवृत्त करणे हा आहे. देशातील विविध भागातून आलेल्या त्यांच्या समवयस्कांशी भावनिक संबंध विकसित करण्यात आणि त्यांचा स्वाभिमान वाढविण्यात मदत करण्यासाठी हा भारत सरकारचा महत्त्वाचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाच्या प्रमुख उपक्रमांमध्ये घटनात्मक अधिकारीच मान्यवर आणि प्रतिष्ठित व्यक्तींसोबत संवाद सत्रेच पॅनल चर्चाच व्याख्यान सत्रच आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत उपक्रमच वक्तृत्व स्पर्धाच कौशल्य विकासच करिअर मार्गदर्शनाशी संबंधित उद्योग भेटीच महत्त्वाच्या आणि ऐतिहासिक स्थळांच्या भेटींचा समावेश आहे.

# ओलीताखाली शेती करण्यास शासनाने मदत करावी - डॉ.अंकुश आगलावे

## कुलगुरू पंजाबराव कृषी विद्यापीठास दिले निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कापुस दिनाचे औचित्य साधून पिडीकेव्ही इंडो काउंट कापूस उत्कष्टता प्रकल्प, कृषी संशोधन केंद्र एकार्जुना येथे नुकताच कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात पंजाबराव कृषी विद्यापीठाचे कुलगुरू शरद घटाक व अधिकारी वर्गाची चमु उपस्थित होते.कुलगुरू घटाक यांनी विविध प्रकल्पांना भेटी देवून समस्या जाणून घेतल्या. एकार्जुना प्रकल्पाचे काम उत्कृष्ठ असल्याची ग्वाही यावेळी दिली.

पालकमंत्री तथा सांस्कृतिक व वने मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पंजाबराव कृषी विद्यापीठास वेळोवेळी मदत केली तथा तीन करोडचा फंड दिला असल्याचे यावेळी सांगितले.



कुलगुरू यांनी सांगितले की, विदर्भातचा शेतकरी एका एकर मध्ये जवळपास ५ क्विंटल कापुस उत्पादन करतो यापेक्षा अधिक कापुस कसे उत्पादन करता येईल यावर देखील भर देवून विदेशाच्या धरतीवर एका एकरात २० क्विंटल कापूस उत्पादन करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. अंकुश आगलावे यांनी मराठवाडा व खान्देशातील शेतकरी यांचे उदाहरण देवून बागायती शेती कशी करता येईल व शेती ओलीताखालील आणण्यास काय उपाययोजना करावे लागून कमी खर्चात जास्त उत्पादन कसे घेता येईल याकरीता कुलगुरू घटाक यांना निवेदन दिले आहे. यावेळी एकार्जुना येथील शेतकरी बांधव व कृषी संशोधन केंद्र, एकार्जुना येथील अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# गितेश सातपुते यांची राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या भद्रावती शहर अध्यक्ष पदी नियुक्ती

## शहराची जबाबदारी मिळताच गितेश सातपुते यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**भद्रावती । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या आणि स्वतःचा व्यवसाय सांभाळून जनहितासाठी वेळ देणाऱ्या गितेश सातपुते यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी त्यांची भद्रावती शहराच्या शहर अध्यक्ष पदी नियुक्ती केल्याने गितेश सातपुते यांच्या निकटवर्ती सहकारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या मान्यतेने चंद्रपूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भद्रावती शहर अध्यक्ष पदी गितेश सातपुते यांची नियुक्ती करण्यात येत आल्याचे नियुक्ती पत्र जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी दिले आहे. गितेश सातपुते यांच्या नियुक्तीने भद्रावती शहरात राष्ट्रवादी पक्षाची ताकत वाढेल असे संकेत मिळतं असुन पक्ष संघटन वाढविण्यासाठी पूर्ण जोर लावून नगरपरिषद निवडणुकीत पक्षाचे नगरसेवक व येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रात आमदार निवडून आणू अशी प्रतिक्रिया गितेश सातपुते यांनी व्यक्त केली.

# जागतिक टपाल दिवस

**काल जागतिक टपाल दिवस होता. अपवाद वगळता याची अनेकांना कल्पना नसावी असे वाटते.अलीकडे छोटीसे निमित्त मिळाले तरी सोशल मीडियावर वावरण्याची संधी कोणी सोडत नाही. शुभेच्छांसाठी आपण बहाणे शोधत असतो. कालच्या जागतिक टपाल दिवसाची कल्पना असती तर सोशल मीडियावरती दिसली असती. काळाच्या ओघात विस्मृतीत जात असलेल्या टपाल सेवेचे महात्म्य सगळ्यांनी समजून घेणे आवश्यक वाटते. कधीकाळी अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारी, जीवनात चैतन्य निर्माण करणारी टपाल सेवा आता मरगळलेल्या अवस्थेत आहे की काय? असे वाटायला लागले आहे.**




कालची तारीख ९ ऑक्टोंबर. काय विशेष होतं या तारखेला? काही आठवतं का? नाही आठवत ना? बरोबर आहे. कसे आठवणार? आजच्या मोबाईल, इंटरनेटच्या जमान्यात आपल्या जुन्या गतकालीन वैभवशाली स्मृती आपण जणू विसरत चाललो आहोत की काय असे वाटायला लागले आहे.असे वाटण्याचे कारणही तसेच आहे. कालचा दिवस म्हणजे ९ ऑक्टोबर हा जागतिक टपाल दिवस होता. कधीकाळी हा दिवस जागतिक टपाल दिन म्हणून धडाक्यात साजरा व्हायचा. परंतु काल त्याचे फारसे अस्तित्व जाणवले नाही.उठसुठ विविध जागतिक दिन साजरे करण्यासाठी मरमर करणारे आपण सगळे राबराब राबतो. परंतु हा दिवस सोशल मीडियावर फारसा दिसून आला नाही. म्हणून हा टपाल दिन आज दीन म्हणजे खरोखरच गरीब झाला आहे की काय असे वाटायला लागले आहे. हा दिवस काळाच्या ओघात गडप झाला आहे की काय अशी मनाला रूखरूख वाटली. कारण काही अपवाद वगळता सोशल मीडियावर कुठेही तो हुदृडताना दिसला नाही. अलीकडे लहानलहान प्रसंगातून निमित्त शोधत सोशल मीडियाच्या माध्यमातून भावना व्यक्त करणारी तरुणाई टपाल दिनाबाबत इतकी उदासीन कशी समजले नाही. अनेक युवकांना विचारणा केली असता टपाल म्हणजे काय? टपाल कशाला म्हणतात? असा प्रतिप्रश्न त्यांच्याकडून ऐकायला मिळाला. यावरनं विद्यमान तरुण पिढीचे ज्ञान किती विस्मृत होत चालले आहे हे लक्षात येते. दरवर्षी ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिवस साजरा केला जातो. जगात दरवर्षी टपाल दिवस साजरा करण्याचा हेतू एवढाच की, टपाल सेवा आणि त्यातील विभागांविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. त्याची माहिती अशी सांगतात की, युनिव्हर्सल पोस्टल युनियनची उभारणी करण्यासाठी १८७४ मध्ये स्विझर्लंडची राजधानी बर्न येथे २२ देशांनी मिळून करारावर सही केली होती. १९६९ मध्ये आयोजित केलेल्या संमेलनात जागतिक टपाल दिनाची घोषणा करण्यात आली. १ जुलै १८७६ ला भारत युनिव्हर्सल पोस्टल युनिव्हर्सल सदस्य होणारा पहिला आशियाई देश ठरला. हा झाला इतिहास.परंतु काल सोशल मीडियावर काही अपवाद वगळता हा टपाल दिवस कुठेही साजरा होताना दिसला नाही. अलीकडे तरुणाई दररोज कुठल्या ना कुठल्या प्रकारचे जागतिक दिवस साजरे करत असतात. असा एकही दिवस उगवत नाही की ज्या दिवशी सोशल मीडियावर जागतिक दिवसाच्या आठवणी होत नाही. दररोज कुठला ना कुठला जागतिक दिवस आपल्याकडे साजरा होत असतो. परंतु काल मात्र तसे आढळले नाही .याचे कारण काय तर नव्या पिढीला जुन्या मौलिक गोष्टींचा विसर पडत चालला आहे. त्याचे हे उदाहरण म्हणता येईल. टपालाचे महत्व काय होते हे साधारणतः २०-२५ वर्षांपूर्वीच्या पिढीला विचारा . त्या काळात डोकावून बघितले तर आपल्या लक्षात येईल जेव्हा मोबाईल, इंटरनेट नव्हते तेव्हा दारामध्ये सगळे पोस्टमनदादाची वाट बघत




असायचे. विशेषतः रक्षाबंधन, दिवाळी, गुढीपाडवा, ख्रिसमस, ईद वगैरे अशा विविध धर्मांचे महत्त्वपूर्ण सणानिमित्त लोक , नातेवाईक, शुभचिंतक त्या दिवशी टपालाच्या माध्यमातून पोस्ट कार्ड व शुभेच्छा संदेश पाठवून एकमेकांना शुभेच्छा द्यायचे. त्यातून दिसणारा गोडवा मनाला आनंद व गारवा देऊन जायचा. महाविद्यालयीन युवक युवती टपालाच्या माध्यमातून शुभेच्छा संदेश पाठवून आपल्या भावना एकमेकांपर्यंत पोहोचवायचे. दशकापूर्वी पोस्टमन, चिट्ठी, पोस्टकार्ड, डाकघर, पोस्टऑफिस, आंतरदेशीय पत्र, शुभेच्छा पत्र अशा विविध प्रकारच्या साधनांची व शब्दांची दुनियाच निराळी होती.आता ते सगळे स्वप्नरंजन वाटते.या माध्यमातून समाजमन अभिव्यक्त व्हायचे.आपल्या भावनांची देवाणघेवाण करायचे. समाज मनाची लोकप्रिय भावना लक्षात घेता त्या काळात या विषयावर अनेक चित्रपटही निघाले आहेत. फर्स्ट लव लेटर असो की संजय दत्तचा नाम चित्रपट असो. नाम चित्रपटातील पंकज उदास यांनी गायलेले ते गाणे अजूनही अनेकांच्या डोळ्यात पाणी आणते. चिठ्ठी आयी है, चिठ्ठी आयी है, बडे दिनोके बाद,दे वतनो को याद,वतनसे चिठ्ठी आयी है.अशा कितीतरी गाण्यांच्या ओळी ओठांवर तरळत होत्या.तेव्हा मनातील भावना व्यक्त करण्यासाठी पोस्ट ऑफिस, पोस्टमन याशिवाय दुसरा पर्याय नसायचा. सासुरवाशीण व माहेरकडील मंडळी एकमेकांच्या पत्राची एखाद्या चातकाप्रमाणे वाट बघत . सगळ्यांना आतुरतेने पोस्टमनदादाची प्रतिक्षा असायची.सायकलवरून येणारा पोस्टमनदादा दिसला रे दिसला की सारं गांव त्यांच्याभोवती गोळा होत. अनेकांच्या आशा काहीतरी निरोप आला म्हणून पल्लवीत व्हायच्या. अपेक्षित पत्र मिळाले नाही की अनेकांच्या चेहऱ्यावर उदासी पसरायची. पोस्टमनदादा गावकऱ्यांच्या सुखदुःखाचा साक्षीदार असायचा. केवळ पत्र आणून देणेच पोस्टमनचे काम नसायचे. अनेकदा संबंधित आप्तस्वकीय निरक्षर असल्याने ज्यांना वाचता येत नाही त्यांना पत्र वाचून देण्याची जबाबदारी सुद्धा पोस्टमनदादाचीच असायची. त्यामुळे अनेकांच्या व्यक्तिगत जीवनाशी आणि भावनांशी पोस्टमनदादाचे नाते आपोआपच जुळायचे. परंतु मोबाईलच्या जमान्यात आता टपाल हद्दपार झाले आहे. कधीकाळी या टपाल सेवेने संवेदनशील जनमाणसांच्या भावना जपण्याचे काम केले. पूर्वी पत्रलेखन हा माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटक असायचा. जुन्या पिढीला विचारा. प्रिय, तिर्थरूप, तिर्थस्वरूप, सप्रेम नमस्कार, विनंती विशेष , पत्र लिहिण्याचे कारण की, हे शब्द ऐकले तरी आजही मन कसे मोहरून येते. १०-१५ पैशांमध्ये घरभर आनंद पसरायचा. दहा-पंधरा पैशाचे हे पोस्टकार्ड अनेकांच्या मनाला आनंद देऊन जायचे.आता काळाच्या ओघात हे सगळे गडप झाले आहे. अनेकांकडे पैसा आला, संपत्ती आली. परंतु पंधरा पैशांच्या पत्रातील आनंदाची सर लाखो रुपयांना नाही.संपर्कासाठी टपाल हेच मुख्य माध्यम असल्याने ती अनेकांच्या जगण्याची लाईफलाईन होती.आता हे सगळं कालबाह्य झाल्याने नवीन पिढीला त्यातील संवेदना काय कळणार?

**सत्कार्याने व निश्चित ध्येय गाठण्याच्या निश्चयाने जी व्यक्ती झपाटलेली असते त्या व्यक्तीच्या विधायक कार्याला काळ, वेळ, परिसर व परिस्थिती मर्यादा घालू शकत नाही. अशी माणसं कोणत्याही अडचणी आणि वाईट परिस्थितीचा बावू करत नाहीत. अनंत अडचणी आल्या तरी त्या अडचणींवर मात करत प्रत्यक्ष बिकट परिस्थितीवर आरुढ होऊन संकटाशी दोन हात करत हाती घेतलेले कार्य सिद्ध करण्यासाठी अहोरात्र झटतात. स्वतःसाठी कमी पण जनकल्याणासाठी जास्त जगणाऱ्या व्यक्तींसमोर साक्षात संकटे आणि बिकट परिस्थितीही हात टेकल्याशिवाय राहत नाही. हे मात्र सत्यच आहे. अशी माणसं दुसऱ्याच्या डोळ्यातील अश्रू पुसून त्यांच्या जीवनात आनंदाची बाग फुलवित असतात. इतरांच्या आयुष्यातील आनंदाची पहाट पाहून स्वतः आनंदी राहणारे व्यक्ती फार कमी पहावयास मिळतात. जगाच्या सुखातच आपले सुख शोधणाऱ्या व जनसामान्यांच्या भल्यासाठी अहोरात्र झिजणाऱ्या व्यक्ती म्हणजे एखाद्या देवदूतापेक्षा कमी नाहीत. मी प्रत्यक्ष देवदूत पाहिला नाही. पण आपल्या कर्तुत्वाने यशाची शिखरे पादाक्रांत करत आपले सकल आयुष्य दुसऱ्यासाठी झिजवून सच्चा लोकसेवक ठरलेल्या आदरणीय श्री तुकारामजी पवार साहेबांच्या रूपाने मी एक देवदूतच पाहिला. असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. अशा या कर्तुत्वान व दृढनिश्चयी व्यक्तिमत्त्वाला मी लहानपणापासूनच पाहत आलो आहे. माझ्यासह अनेकजनांनी त्यांच्या कार्याची व व्यक्तिमत्त्वाची प्रेरणा घेऊन यशस्वी झाली आहेत. यात तिळमात्र शंका नाही. लहानपणापासूनच त्यांना मी आपला आदर्श मानत आलो आहे. अशा या आदर्श लोकसेवकाबद्दल मला लिहायची संधी मिळणे ही माझ्यासाठी खूप आनंदाची बाब आहे.**

# माणिकगड पहाडावरील शैक्षणिक क्रांतीचा अग्रदूत-तुकारामजी पवार

या कर्तुत्व संपन्न व्यक्तिमत्त्वाचा जन्म १० ऑक्टोबर १९५३ ला नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात असलेल्या शेकापूर या छोट्याशा गावात झाला. आदरणीय तुकारामजी पवार यांची जन्मभूमी मराठवाड्यातील शेकापूर असली तरी त्यांची कर्मभूमी मात्र पूर्व विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील शेवटच्या टोकावरील जिवती तालुक्यात असलेल्या अतिदुर्गम परिसरातील पट्टीगुडा नं. १, हे आपले गावच नव्हे तर संपूर्ण जिल्हा त्यांची कर्मभूमी झाली आहे.१९६५ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळाने मराठवाडा हा जास्त प्रभावित झाला. या दुष्काळप्रसंगी मराठवाड्यातून अनेक लोक कामाच्या शोधात जिवती तालुक्यातील माणिकगड पाहाडावर आले. इथे आलेल्या लोकांपैकी काहीजण मराठवाड्यातील आपल्या मूळ गावी परत गेले. पहाडावरील जंगल व विपुल प्रमाणात असलेल्या गुरांचा चारा याविषयीची माहिती पवार साहेबांच्या गावच्या काही


डॉ.माधव कांडणगिरे
घुग्घूस

लोकांनी त्यांच्या कुटुंबीयांना सांगितली. त्या काळात पवार कुटुंबाकडे शेकडो गुरेंढोरे होती. दुष्काळामुळे या गुराढोरांना चारापाणी करणे फार कठीण झाले होते. या दुष्काळात चारापाण्यावीना गुरेढोरे मरू लागली होती. या गुरांना कसे वाचवायचे असा गंभीर प्रश्न त्यांच्या कुटुंबीयांसमोर पडलेला असताना त्यांना माणिकगड पहाडा बद्दल माहिती मिळाली. मुक्या जनावरांवर निरतिशय प्रेम करणाऱ्या या कुटुंबाने आपल्या गुरा ढोरांसाठी आपण कुठेही जाऊ पण गुरांना वाचवू असा ठाम निश्चय केला. आणि आपली गुरे ढोरे वाचविण्यासाठी इ.स. १९७० मध्ये मजल दरमजल करत ते जिवती तालुक्यातील माणिकगड पहाडावर येऊन गुराढोरांना अन्न पाण्याला लावले. निव्वळ गुराढोरांसाठीच पहाडावर पिटिगुडा येथे ते स्थिरावले. गुरांना वाचविण्यासाठी स्थलांतरित झाले तेव्हा आदरणीय तुकारामजी पवार हे नांदेड येथील सायन्स कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. अशा बिकट परिस्थितीतही त्यांनी आपले शिक्षण सुरूच ठेवले. त्यांच्या आई-वडिलांनी शिक्षणासाठी त्यांना सतत प्रोत्साहित केले. साहेबांचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंत पहाडावरील लोक मात्र अनेक समस्यांना तोंड देत संघर्ष करत येथे बऱ्यापैकी स्थिरावले होते. त्यात पवार साहेबांचे कुटुंबही होते.नांदेड येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना पवार



साहेब पट्टीगुडा या आपल्या गावी सुट्ट्यांमध्ये येत असत यावेळी आई-वडिलांना घरच्या कामात व गुराढोरांवर लक्ष ठेवण्याच्या कामात ते मदत करत असत. याच वेळी त्यांना आपल्या माणिकगड पहाडावरील आदिवासी व इतर लोकांच्या समस्यांचा बऱ्यापैकी अभ्यास झालेला होता. या परिसरासाठी व येथील लोकांसाठी आपण काहीतरी सेवाभावी कार्य केले पाहिजे. असे त्यांना वारंवार वाटायचे. आपल्या आईवडिलांनी आपल्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. आपल्याला शिकविले आपण उच्चशिक्षित झालो. असे त्यांना सतत वाटायचे. या परिसरातील जीवघेण्या समस्या बघून ते अस्वस्थ व्हायचे. यातूनच त्यांच्या डोक्यात शैक्षणिक सेवेचा विचार आला. या काळी या परिसरात कुठेही शिक्षणाची सोय नाही. असे लक्षात आल्यानंतर आपण आपल्या पहाडावरील लोकांसाठी व त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय करून दिली पाहिजे असे त्यांना मनोमन वाटू लागले. इथूनच त्यांच्या विधायक कार्याची सुरुवात झाली.आदरणीय श्री तुकारामजी पवार यांनी विद्यार्थी दशेतच १९७९ मध्ये 'श्री जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ'ची स्थापना करून आपल्या शैक्षणिक सेवेला सुरुवात केली. पुढे आपल्या शैक्षणिक कार्याचा विस्तार करत १९९२ मध्ये 'धनाजी नाईक शिक्षण प्रसारक मंडळ' या दुसऱ्या शैक्षणिक संस्थेची स्थापना करून या दोनही संस्थांच्या माध्यमातून अतिदुर्गम, आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त भागात निवासी आश्रम शाळा, वसतिगृहे, कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालय अशा वेगवेगळ्या शैक्षणिक घटकांच्या माध्यमातून पवित्र ज्ञानदानाचे कार्य अविरत पने सुरू आहे. या शाळा महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊन येथील विद्यार्थी विविध प्रशासकीय पदावर अनेक विभागात देश विदेशात कार्यरत आहेत.माननीय तुकाराम पवार हे एक उत्तम मातृ-पितृ भक्त आहेत. त्यांनी सुरू केलेल्या शाळा महाविद्यालयांना आपल्या आई वडिलांचे नाव देऊन त्यांच्या पुण्यतिथीच्या वेळी परिसरात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार व समाज प्रबोधनकारांचे कार्यक्रम ठेवून समाजात जागृती करण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. यातून समाजापुढे एक उत्तम आदर्श त्यांनी घालून दिला आहे.आपल्या शाळा महाविद्यालयात अत्यंत गुणवान, बुद्धिवान, गुणवत्ता प्राप्त व मेहनती शिक्षक व कर्मचाऱ्यांची नियुक्ती त्यांनी केली आहे. यातून ते एक उत्तम गुणग्राहक असल्याचे दिसून येते. यासोबतच त्यांच्या स्वतःच्या ५० सदस्यांचे संयुक्त कुटुंब उत्तमपणे एकसंघ ठेवत आपली कुटुंब वत्सलता जोपासली आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या विभक्त कुटुंब पद्धतीपूढे आपले कुटुंब संयुक्त ठेवत एक नवीन आदर्श लोकांपुढे त्यांनी घालून दिलेला आहे.अशा या व्यक्तिमत्त्वाच्या कार्यात त्यांच्या अर्धांगिनी सौ सुनीताताई पवार व त्यांचे कुटुंबीय त्यांना मोलाची साथ देत आहेत.अशा सेवाभावी कर्तृत्व संपन्न, आदिवासी सेवकाच्या कार्याचा गौरव महाराष्ट्र शासनाने 'दलित मित्र' पुरस्कार देऊन केलेला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरामय, निरोगी, दीर्घायुष्य प्राप्त होवो व त्यांच्या हातून अजून समाजसेवा घडो व त्यांच्या विधायक कार्याला बळ मिळो.

# वरोरा येथे मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न झाला

## खिदमत सोशल फाऊंडेशनचा उपक्रम

**वरोरा । प्रतिनिधी**

जगाला मानव सेवा हीच श्रेष्ठ सेवा हा संदेश देणारे हजरत मोहम्मद सल्लल्लोहो अलेंही व सल्लम यांच्या जयंती महोत्सव निमित्त येथील खिदमत सोशल फाउंडेशन व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ऑक्टोबर रोज शनिवारला भव्य रोग निदान शिबिर संपन्न झाला. शिबिराचे उद्घाटन वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, सामाजिक कार्यकर्ते डॉ.हेमंत खापने, शहर काँग्रेस शहर अध्यक्ष विलास टिपले, शिवसेना(उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे विलास नेरकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. शिबिरात सहाशे नागरिकांनी शिबिरचा लाभ घेतला. रक्तदाब, ब्लड शुगर, किडनीचे आजार, हृदयरोग, नेत्ररोग, आतड्याचे आजार, पोटाचे आजार, मणक्यातील गॅप, त्वचेचे विविध आजार इत्यादी रोगांचे निदान व त्यावर उपचार करून रूग्णांना मोफत औषधही वापट करण्यात आली.या रोग निदान शिबिरात उपजिल्हा रुग्णालय वरोरा ची टिम उपस्थित होती. डॉ.उल्हास बोरकर( अस्थि रोग तज्ञ), किरण धांडे, तनिष्का खडसाने, गोविंद कुंभारे (समुपदेशक आय सी टी सी ), आरोग्य मित्र अमोल भोंग यांनी येणाऱ्या नागरिकांचे प्रधानमंत्री आयुष्यमान योजनेचे १०९ कार्ड आणि आभा ७९ कार्ड बनवून दिले गेले. या भव्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी खिदमत सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष सय्यद आसिफ रजा, उपाध्यक्ष सादिक इकबाल थैम, सचिव वसीम इकबाल शेख,कोषाध्यक्ष नियाज अय्यूब सय्यद, मकसूद शेख साजिद पठाण, शोएब शेख, नकीब काजी, समीर अजमेरी,अन्सार हुसेन शेख ,तनवीर शेख, अबरार सय्यद, रजा सय्यद, आसिफ पठाण, अब्दुल सोनीश, कबीर शेख, इसरार शेख, सय्यद अमीनुद्दीन, कैफ, मोईन शेख, कैफ शेख, आमिर शेख, तोसिम शेख, अरशद शेख व अन्य लोकांनी परिश्रम घेतले.



# निजबल भेटीने जागवली स्वयं प्रेरणा




**वरोरा । प्रतिनिधी**

लोकमान्य कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी नुकतीच महारोगी सेवा संचालित निजबल या दिव्यांग विद्यार्थ्यासाठी असलेल्या संधी निकेतन अपंगांच्या कर्मशाळेला भेट दिली. अंध,अस्थिव्यंग, कर्णबधिर विद्यार्थ्यांचे कला कौशल्य पाहून विद्यार्थिनी हरखून गेल्या. कर्मशाळेचे व्यवस्थापकीय अधीक्षक रवींद्र नलगिंटवार यांनी निजबल प्रकल्पाबद्दल सविस्तर माहिती सांगितली.सोबतच संवादासाठी आवश्यक सांकेतिक भाषेचा प्राथमिक परिचय करून दिला. विद्यार्थीनींनी, दिव्यांग विद्यार्थी घेत असलेले व्यावसायिक शिक्षण, अल्पावधीत प्राप्त केलेला थक्क करणारा कौशल्य विकास अनुभवला. संस्थेच्या शिक्षकवृंदाने अतिशय आत्मीयतेने संस्थेत उपलब्ध प्रशिक्षण स्वरूपाबद्दल माहिती दिली. विद्यार्थीनींनी सांकेतिक भाषेतून विद्यार्थ्यांना भेटता आल्याचा आनंद प्रकट केला. ही भेट विद्यार्थिनींसाठी स्वयं प्रेरणा जागृत करणारी व अनुभव समृद्ध करणारी ठरली.विद्यार्थिनींना आनंदवनातील स्व. बाबा आमटेंच्या सेवा,समर्पण साधनेने पुनीत झालेल्या कार्याचे दर्शन व्हावे, दिव्यांग व्यक्तिंमधील विशेष क्षमतेचा परिचय व्हावा या हेतूने ही क्षेत्र भेट आयोजित करण्यात आली होती. हॅपी क्लास प्रकल्प प्रमुख राघवेंद्र अडोणी यांनी या उपक्रमाचे संयोजन केले.स्मिता दातारकर, स्मिता तागडे यांनी या उपक्रमाला सहकार्य केले.

# अतिदुर्गम कोंदावाही येथे विकास कामांचे भूमिपूजन

## माजी जि.प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांचा पुढाकार






**एटापल्ली । प्रतिनिधी**

तालुक्यातील येमली ग्रामपंचायत अंतर्गत समाविष्ट गोंदावाही येथे सिनेट सदस्य तथा माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आश्रम यांच्या हस्ते नुकतेच विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

येमली ग्रामपंचायत अंतर्गत समाविष्ट गावे अतिदुर्गम ओळखले जातात.त्यात कोंदावाही गावाचाही समावेश होतो.या गावात विविध विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी गावकऱ्यांनी यापूर्वीच केली होती. नागरिकांची अडचण लक्षात घेऊन भाग्यश्री आत्राम यांनी तात्काळ निधी मंजूर करण्यासाठी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे मागणी केली.या गावात विविध विकास कामे केली जाणार असून नुकतेच समाज मंदिर बांधकामाचे भूमिपूजन सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते करण्यात आले.विशेष म्हणजे स्वतःचा वाढदिवस असतानाही घरी न थांबता त्यांनी ६ ऑक्टोबर रोजी अतिदुर्गम कोंदावाही गाठून समाज मंदिर बांधकामाचे भूमिपूजन केले.यावेळी गावकऱ्यांनी त्यांचा वाढदिवस असल्याने जल्लोषात स्वागत करून सुखद धक्काच दिला.यावेळी सिनेट सदस्य तनुश्री आत्राम,येमलीचे सरपंच ललिता मडावी,राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे अहेरी तालुका अध्यक्ष सारिका गडपल्लीवार,रामजी कत्तीवार, कोदावहीचे भुमिया दुहे तलाडे, बंडू तलांडे , कोल्लू तलाडे, विजया तंलाडे, संतोष तंलाडे,येमली पेम्मा बिट्री तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे जंगी स्वागत

अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांना नुकतेच गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री पदाची जबाबदारी मिळाली आहे. गोंदिया जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्यावर त्यांचा एटापली तालुक्यातील हा पहिलाच दौरा होता. त्या अनुषंगाने एटापल्ली तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या जल्लोषात मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे स्वागत केले.

# दुर्दैवी! मरणानंतरही नरकयातना संपेनात

## खाटेवर मृतदेह ठेवत नदी पार करण्याची वेळ

**गडचिरोली । प्रतिनिधी**

एकीकडे देशाचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. मात्र आजही अनेक गाव खेड्यांमध्ये मूलभूत सुविधा नाहीये. गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भाग असलेल्या भामरागड तालुक्यात हीच स्थिती असल्याने आदिवासींचे मोठे हाल होत आहेत.नदी,नाल्यावर पुल नसल्याने तुडुंब भरलेल्या नदीतून जीव धोक्यात टाकून प्रवास करावा लागत आहे.एवढेच नाही तर गावातील एका इसमाचा मृत्यूनंतर त्याचा मृतदेह गावकऱ्यांनी चक्क खाटेवर आणावा लागला. या घटनेचा व्हिडिओ समोर आला असून गुंडेनुर नदीवर पूल नसल्याने गावात रुग्णवाहिका जाऊ न शकल्याने मृतदेह चक्क खाटेवर घेऊन जाताना दिसतंय.अतिदुर्गम,आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त म्हणून भामरागड तालुक्याची ओळख. लाहेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणजे तालुक्यातीलच नव्हेतर राज्याच्या शेवटचा टोकावर असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून ओळखले जाते. लाहेरी परिसरातीलच नव्हेतर छत्तीसगड राज्यातील रुग्ण सुद्धा याच प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी येत असतात.मात्र, लाहेरी वरून तीन ते चार किलोमीटर अंतरावर असलेल्या गुंडेनुर नाल्यावर पुल नसल्याने गुंडेनुर परिसरातील आदिवासींना पावसाळ्यात या नाल्यातून जीवघेणा जलप्रवास करावा लागतो.गुंडेनूर नदी पलीकडे कुवाकोडी,दामनमर्का, फोदेवाडा, बिनागुंडा, पुंगासुर, पेरमलभट्टी, गुंडेनुर आदी गावांचा



समावेश आहे.पावसाळ्यात यासह आदी गावातील नागरिकांना हाल अपेष्टा सहन करावा लागत आहेनुकतेच ४ ऑक्टोबर रोजी गुंडेनूर येथील कटिया कारिया पुंगाटी (५०) या इसमाची प्रकृती बिघडल्याने गावातील नागरिकांनी त्याला सकाळी १० वाजताच्या सुमारास उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र,लाहेरी येथे दाखल केले.मात्र,प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला तात्काळ लाहेरी वरून ग्रामीण रुग्णालय,भामरागड येथे हलविण्यात आले.तिथे उपचार सुरू असताना रात्रीच्या सुमारास कटिया पुंगाटी याचा मृत्यू झाला.रात्रीच्या सुमारास मृतदेह गावाकडे घेऊन जाणे शक्य नसल्याने ५ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास गावकऱ्यांनी गावातील ट्रॅक्टर च्या साहाय्याने मृतदेह घेऊन गुंडेनूर नाल्यापर्यंत पोहोचले.पावसाळ्याचे दिवस असल्याने नाला तुडुंब भरून वाहत होता.त्यामुळे गावकर्यांनी कटिया पुंगाटीचा मृतदेह चक्क खाटेवर घेऊन गुंडेनूर गाठले.२१ सप्टेंबर रोजी याच परिसरातील आदिवासींना अंत्यदर्शनासाठी कोयर गावात जायचे होते.मात्र,नदी,नाले तुडुंब भरून वाहत असल्याने गावकऱ्यांनी नाल्याच्या दोन्ही बाजूला झाडाला दोरी बांधून स्वतःचा जीव धोक्यात टाकून नाला ओलांडतानाचे चलचित्र मोठ्या प्रमाणात समाजमध्यमात वायरल झाले होते.त्यानंतर ५ ऑक्टोबर रोजी तुडूंब भरलेल्या नाल्यातून चक्क मृतदेह खाटेवर घेऊन जाण्याची नामुष्की आदिवासींवर ओढवल्याचे दिसून आले.त्यामुळे या भागातील नदी,नाल्यावर पुलाचे बांधकाम करण्याची मागणी केली जात आहे.

# राजुरा शहरातील मुलभूत समस्या सोडवा!

## विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात भाजपाचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन




**राजुरा । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविणे, हे नगरपरिषदचे प्राथमिक कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे, दिवाबत्ती, त्यांच्या घरातील केरकचरा रोज संकलित करणे तसेच नालेस्वच्छता, गडर लाइनची योग्य व्यवस्था असावी, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने सदैव तत्पर असावे. प्रत्येक प्रभागात नागरिक अनेक समस्यांशी संघर्ष करीत आहेत, या सर्व समस्यांना प्राधान्याने घेऊन त्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी तातडीने योग्य कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी घेऊन भाजपाचे विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात आज भाजपा राजुरा शहराच्या शिष्टमंडळाने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुरज जाधव यांची भेट घेत निवेदन दिले.

यावेळी तालुकाध्यक्ष सुनिल उरकुडे, सुरेश रागीट, माजी नगरसेविका उज्ज्वला जयपुरकर, प्रिती रेकलवार, शितल वाटेकर, अजय उमरे, दिलीप गिरसावळे, दिपक झाडे आदिंची उपस्थिती होती.

# आनंदवनात बीजोत्सव-२०२३ चे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती, आनंदवन द्वारा संचालित व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय व आनंदवन कृषी तंत्र विद्यालय आनंदवन, वरोरा यांचा संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ ऑक्टोंबर दरम्यान आनंदवन येथे महारोगी सेवा समिती वरोराच्या अमृत महोत्सवी वर्ष तथा आंतरराष्ट्रीय भरड धान्य पर्वाच्या निमित्ताने देशी बियाण्यांच्या संवर्धनाकरिता आनंदवन बीजोत्सव २०२३ चे आयोजन आनंदवन,वरोरा येथे करण्यात आले होते.

निसर्गातील उपलब्ध संसाधनांचा अविवेकी वापरामुळे, सध्याच्या परिस्थितीतील हवामान बदल, पर्यावरणीय प्रदूषणामुळे व मातीचे धोक्यात आलेले आरोग्य आणि पर्यायाने मानवी आरोग्य समोर उभी झालेली आव्हाने लक्षात घेता देशी बियाणांच्या संवर्धनाकरिता तसेच विष मुक्त शेतीची संकल्पना शेतकरी तथा विद्यार्थ्यांना समजून घेता यावीत या अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन आनंदवनातील मंत्री हॉल येथे करण्यात आले होते.आनंदवन-



बीजोत्सवाचा उदघाटन समारंभ दि. ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी २ वाजता संपन्न झाला. उद्घाटक म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे कुलगुरू माननीय डॉ. शरद गडाख हे उपस्थित होते. अधक्षस्थान डॉ. विकास आमटे सचिव महारोगी समिती वरोरा यांनी भूषविले तर विशेष अतिथी म्हणून डॉ. डी.बी. उंदिरवाडे संचालक कृषी विस्तार विभाग डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला, चंद्रपूर, डॉ. सुहास पोतदार प्राचार्य आ.नि.कृ.म. वरोरा हे उपस्थित होते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून श्री.सुधाकर कडू, डॉ. दिलीप पेशवे, हर्षदा पोतदार, सुभाष शर्मा, वसंत फुटाणे, प्राची माहूरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या तीन दिवसीय बीजोत्सव कार्यक्रमात सेंद्रीय शेतीत प्रत्यक्ष प्रयोग करून शेती पिकविणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी व देशी बीज संधारणामध्ये कार्यरत असलेल्या अनुभवी व्यक्तींनी आपले अनुभव व कार्य सांगितले. त्यामध्ये विविध क्षेत्रातील व्यक्तींनी आपले सहभाग दर्शविला. या कार्यक्रमात सुभाष शर्मा, संजय पाटील, सुरेश गरमाडे, विद्या रुद्राक्ष, शिवदास कोरे, प्रताप मारोडे, डॉ. शामकुवर, सुभद्रा ,आसावरी पोशेट्टीवार, निर्मला काठोके, पद्मताई गुरनुले, गीताताई, श्वेता भट्टड, शंकर घाटावार, सावित्रीबाई अनंत आराधना ताठे, ईश्वर माकोडे, अनंत भोयर, कु. आरती यांनी वेगवेगळया आयोजित चर्चासत्रांच्या माध्यमातून सहभागी शेतकरी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या ३ दिवसीय कार्यक्रमात जमिनीचे आरोग्य कसे जपावे, पीक व्यवस्थापन, कंटूर बांध-बंदिस्ती, बीज संवर्धन गरज व उपाययोजना, बियाणे विषयक कायदे, महिला शेतकरी संमेलन व त्यांच्या कार्याची माहिती, सुरक्षित आहार, शेतमाल प्रक्रिया, तरुण शेतकऱ्याचे शेतीविषयक विचार व अनुभव, बदलत गेलेली पीक पद्धती, अश्या अनेक विषयावर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती तसेच या कृषी-समर्पक, देशी बियाण्यांचे संवर्धनपर कार्यक्रमात संवाद आणि प्रात्यक्षिकांसोबतच देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेल्या बीजसंवर्धन करणाऱ्या, शेंद्रीय शेतीच्या निविष्ठा, नैसर्गिक शेतीच्या संबंधित उपकरणे यांची प्रदर्शिनी व विक्रीचे स्टॉल लावण्यात आलेले होते, त्याबरोबरच भरड धान्य व सेंद्रिय, आयुर्वेदिक आधारित खाद्यपदार्थांची मेजवानीदेखील उपस्थितांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनुभवता आली.

# जिया धड़क धड़क जाए!

२०११ ला प्रदर्शित बॉडीगार्ड चित्रपटात सलमानचा एक संवाद आहे, मुझपे एक एहसान करना, मुझपे कोई एहसान मत करना! खरेतर भारत ऑस्ट्रेलिया लढतीला हा संवाद समर्पक ठरतो. झाले काय तर केवळ फलंदाजी किंवा गोलंदाजीच नव्हे तर क्षेत्ररक्षण सुद्धा एखाद्या लढतीचे रूप कसे पालटू शकते याचे जिवंत उदाहरण या लढतीत दिसले. मिचेल मार्श ने विराटला दिलेलं जीवदान कांगारूंचा गळा घोटण्यास पुरेसं ठरलं. भावनांचा आणि धावांचा भुकेला असलेल्या क्रिकेट मुरारी, विराटने पुन्हा एकदा त्याला चेस मास्टर का म्हणतात हे दाखवून दिले.

सध्याच्या विश्वचषकात ज्याप्रकारे ३५० ते ४०० धावांचा टप्पा पार पाडला जात आहे ते पाहता टीम इंडियाला २०० धावा म्हणजे सोप्पा पेपर होता. मात्र ऑस्ट्रेलिया संघ हा कष्टकऱ्यांचा संघ आहे, श्रममेव जयते हे त्यांचे ब्रीदवाक्य आहे. या मुळ प्रवृत्तीला जागत ते भारताला विना कष्टाचे जिंकू देणार नाही हे निश्चित होतं. पण प्रारंभीच एवढी दाणादाण उडवतील असं वाटलं नव्हतं. आपल्या तीन गडी बाद दोन धावां, हे ऐकून आत्ताही कंठ दाटून येतो. त्यातही ईशान किशन आणि श्रेयसची आगळीक अक्षम्य आहे असेच वाटते. राहिली बाब रोहितची तर तो चेंडू कहांसे आया था वो, छू के हमारे दिल को कहा गया उसे ढुंढो सारखा होता.अर्थातच मैदानावर परिस्थिती गंभीर होती, विराटच्या साथीला राहुल होता. सततच्या अपयशाचे डाग पुसून काढण्यास राहुल उत्सुक होताच. तसेही राहुलला लग्न मानवले दिसते, त्याचे प्रतिबिंब त्याच्या सुधारलेल्या फलंदाजीत सध्या दिसत आहे. या दोघांनीही अनावश्यक दबाव न घेता, न कुंथता कायमचुर्ण घेतल्यासारखे सरळसोट कसोटी स्टाईल फलंदाजीला प्राधान्य दिले. मात्र चितलं ते घडत नाही. एक सरप्राइज बाऊंसरने विराटला चुकवले आणि करोडो क्रिकेट रसिकांचा श्र्वास क्षणांसाठी थांबला होता. मात्र लेक्स कॅरी आणि मिचेल मार्शने पहले आप, पहले आप करत विराटवर एहसान केले. वास्तविकत: तो झेल कांगारूंसाठी तू जो मिला, हो गया सब हासील सारखा होता. विचार करा ०४ बाद २० धावा हे किती वेदना दायक चित्र असतं.सामन्याचा दबाव काय असतं हे त्यावेळी दिसून आले. यानंतर मात्र हळूहळू कांगारूंची सामन्यावर पकड सैल होत गेली. विराट चे फ्लिक आणि राहुलच्या कव्हर ड्राईव्हने सामन्यात रंग भरला. भरीस भर म्हणून खतरनाक गोलंदाजी करणाऱ्या हेझलवूडला आक्रमणातून हटवल्याने कांगारूंची धार बोथट झाली. इथेच पॅट कमिन्स रणनीतीत चुकला. झॅम्पा नावाच्या डम्सला कमिन्स ने आणले परंतु राहुलने त्याला चौकारांची झप्पी देत त्याची हवा काढून टाकली. राहुलने या सामन्यात आपल्या क्लासी फलंदाजीचे दर्शन दिले. ज्याप्रकारे सामन्याच्या प्रचंड दबावाला झुगारत आपल्या दोन्ही फलंदाजांनी डोके शांत ठेवून फलंदाजी केली ते पाहता या दोघांनी चेन्नईत बर्फाचा होलसेल व्यापार




सुरू करायला हरकत नाही.लढत जवळपास भारताकडे झुकल्यावर कमिन्स ने परत एकदा हेझलवूडला आणले मात्र तोपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. चेंडू सॉफ्ट झाला होता, लक्ष्य किरकोळ उरले होते, इतर गोलंदाज निष्प्रभ ठरले होते. दांत आणि नखं नसलेला हेझलवूड शुद्ध शाकाहारी गोलंदाज वाटत होता. केवळ उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून त्याला विराटचा बळी मिळाला मात्र तोपर्यंत हत्ती गेला आणि शेपूट उरले होते. त्यातही क्लासी राहुलची फलंदाजी आणखी यौवनात आली होती. सोबतच कुंगफू पांड्या असल्याने कांगारूंना या विश्वचषकात विजयारंभ करता आला नाही. टीम इंडियाचं घोडं या सामन्यात न्हालं असलं तरी आपल्या गोलंदाजांनी पुर्वार्धात केलेल्या कामगिरीला विसरता येणार नाही.नाणेफेक जिंकून कांगारूंचे फलंदाजीचे स्वप्न बुम बुम बुमराहने लवकरच भंग केले होते. त्याने मार्शला टाकलेल्या चेंडूने अगदी नागासारखा फणा काढत बॅटला दंश केला आणि उर्वरित काम विराटने अफलातून झेल घेत पुरे केले. तरीपण वॉर्नर आणि स्मिथने अस्सल कांगारू बाणा दाखवत चिवट फलंदाजी केली. मात्र भारतीय फिरकीची भानामती ते पचवू शकले नाही. हाथोडा छाप फलंदाजी करणारा वॉर्नर अखेर कुलदीपला शरण गेला. यानंतर सर जडेजा टीम इंडियाच्या मदतीला धावून आले. जडेजाच्या जादूने स्मिथ सारखा कसलेला फलंदाज चारी मुंड्या चीत झाला. वेग आणि गुडलेंथचा टप्पा जडेजाला बळी च्या बाबतीत मालामाल करून गेला. ज्याप्रकारे जडेजाने स्मिथचा ऑफ स्टंप उडवला ते पाहता स्मिथला आपल्या विकेट पेक्षा सर्वांसमक्ष जडेजाने मामा बनवल्याचे दुःख जास्त झाले असेल.लगेचच तिसाव्या षटकांत जडेजाने लाबुशेन आणि लेक्स कॅरी ला घरी पाठवत कांगारूंचा बाजार उठवला. धोकादायक ग्लेन मॅक्सवेलला कुलदीपने संपवले तर रवी अश्विनने कॅमरून ग्रीन ला. कमिन्स, झॅम्पा आणि स्टार्क ची वळवळ बुमराह, पांड्या, सिराजने संपुष्टात आणली. कांगारू तर्फे वार्नर स्मिथने ६९ धावांची आणि स्मिथ लाबुशेन ने ३६ धावांची भागीदारी केली. मात्र ५० षटकांच्या सामन्यात अशा भागिदाऱ्या कुचकामी ठरतात.सामन्याचा आढावा थोडक्यात घ्यायचे झाले तर एक उत्कृष्ट संघाचा राहुल विराटने उत्तम पाठलाग केला असे म्हणू शकतो. भारतीय खेळपट्टीवर फिरकीपटूंचा दबदबा जगजाहीर असूनही ऑस्ट्रेलियन संघ एकमेव डम झॅम्पाच्या भरवशावर कसाकाय आला याचे आश्चर्य वाटते. या सामन्यातील यशस्वी गोलंदाज जडेजा आणि हेझलवूड, दोघांनीही गुडलेंथचा टप्पा धरून ठेवत यश मिळवले. भारतीय फिरकीचे त्रिकुट सामन्यागणिक आणखी तिखट होत जाईल यात शंका नाही. मात्र उर्वरित सामन्यात ईशान, रोहीत आणि श्रेयसने ,,'दो मिनट में मॅगी' पेक्षा जास्त काळ खेळपट्टीवर उभे राहून चाहत्यांची धडधड वाढणार नाही याची काळजी घ्यावी ही अपेक्षा आहे. कारण प्रत्येक वेळी प्रतिस्पर्धी संघाला आपले गोलंदाज दोनशेत गुंडाळतीलच असे नाही.



डॉ अनिल पावशेकर
मो. ९८२२९३९२८७

# संस्कृतीचा समृध्द मार्ग जोपासण्यासाठी भजन मंडळांना सक्षम करण्याची गरज–आ.जोरगेवार

## लोकसेवक डॉ.सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंती निमित्त भव्य भजन संमेलनाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार त्यांनी केलेली सेवा समाज कधीही विसरणार नाही. डॉक्टरी पेशात असणाऱ्या डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांनी खऱ्या अर्थाने रुग्णसेवा केली. आज त्यांच्या जयंती निमित्त आपण आयोजित केलेले भजन संमेलन त्यांना आपण वाहिलेली सर्वोत्तम आदरांजली आहेच सोबतच संस्कृतीचा समृद्ध मार्ग जोपासण्यासाठी भजन मंडळांना सक्षम करण्याचा संकल्प त्यांच्या जयंती दिनी आज आपण करुया असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम श्री गुरुदेव सेवा शहर शाखा चंद्रपूर च्या वतीने लोकसेवक डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंती निमित्त भव्य भजन संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सर्वाधीकारी गुरुकुंज आश्रम मोझरी चे लक्ष्मणराव गमे , भागवताचार्य मनिष महाराज,



गुरुकुंज आश्रम मोझरी चे उपसर्वाधीकारी दामोधर पाटील , गुरुकुंज आश्रम मोझरी चे प्रचार प्रमुख प्रकाश महाराज वाघ, प्रांताधिकारी विठ्ठलराव सावरकर, जिल्हा सेवाधिकारी ड. दत्ता हजारे, अशोक चरडे, जिल्हा प्रचार प्रमूख रुपलाल कावळे, जिल्हा प्रचार प्रमुख दादाजी नंदनवार, राम राउत, डॉ.अंकुश आगलावे, डॉ. गोपाल मुंधडा, प्रेमलाल पारधी, ड. किरण पाल, वासुदेव सादमवार बबनराव धर्मपूरीवार आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, अध्यात्माकडुन दुरावत चाललेल्या समाजाला भजन किर्तनातून आध्यात्माचेमहत्व आणि त्याचे फायदे याबाबत जनजागृतीचे काम गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने केल्या जात आहे.चांगल्या समाजाच्या निमिर्तीसाठी गुरुदेव सेवामंडळाचे सेवक काम करत आहे. आपल्या वतीने समाजाच्या शेवटच्या भागापर्यंत भजन किर्तनाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश पोहचविण्याचे काम केल्या जातअसल्याचे यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले. आपण यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने भजन महोत्सवाला सुरवात केली आहे.या महोत्सवात विविध भाषीय भजन मंडळे मोठ्या उत्साहात सहभागी होत आहेत. विशेषत: लहान मुलांचे भजन मंडळेसुध्दा यात सहभागी होत आहे ही विशेष बाब असल्याचेही ते यावेळी म्हणाले. अनेक भजन मंडळांकडे भजनासाठी लागणारे साहित्य नाही. त्यामुळे काही मंडळांना आपण ते उपलब्ध करुन दिले आहे. भजनातून मानवातील नकारात्मकता नष्ट होऊन.त्याच्यात सकारात्मकता निर्माण होते. इच्छाशक्ती प्रबळ होते. मनातील वाईट वृत्तीचा नाश होतो. त्यामूळे भजन – किर्तनाची आजही समाजाला गरज असल्याचे यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमाला अनेक भजन मंडळांची व नागरिकांची उपस्थिती होती.

# उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे नियोजनाचा अभाव–जयंत टेमुर्डे

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने दिले निवेदन



**वरोरा । प्रतिनिधी**

सध्या तालुक्यातील शहर व ग्रामीण भागात साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे .आजाराने ग्रस्त रुग्णांची संख्या उप जिल्हा रुग्णालयात वाढत चालली असून वैधकिय अधीक्षक यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे रुग्णाचे हाल होत आहे . ही बाब राष्ट्रवादी काँग्रेस चे वरोरा भद्रावती विधानसभा प्रमुख जयंत टेमुर्डे यांच्या लक्षात येताच त्यांनी . वैधकीय अधीक्षक डॉ. खुजे यांची भेट घेत. रूग्णालयातील समस्याचे निराकरण करण्या संदर्भात निवेदन दिले .

तसेच वैधकिय अधीक्षक डॉ. खुजे यांच्याशी नियोजन ,आरोग्य साहित्य , दवाई , व परिसर स्वच्छता या विषयावर चर्चा करून ग्रामीण व शहरी जनतेला आपल्या विभागामार्फत सेवा देण्याची विनंती करण्यात आली.तसेच वरोरा येथे ट्रॉमा केअर दवाखाना सुरू आहे पण त्या ठिकाणी डॉक्टरची कमतरता असल्याने पाहिजे ती सुविधा आपण जनतेला देऊ शकत नाही या साठी स्टॉप चे नियोजन करावे असे सांगण्यात आले .या वेळी अविनाश ढेगळे, अरुण साहरे, राजू वरघाने,विजय धदरे,प्रवीण वासेकर,सुनीता राऊत,लता हिवरकर, सुशीला तेलमोरे,मोनाली काकडे, शिल्पा रूयारकर,मारोती किंनाके, नागाजी निंभरकर,मुकेश वाटकर व असंख्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे पदाधिकारी उपस्थीत होते.

# खाजगीकरण,कंत्राटीकरणा विरोधात सामाजिक संघटनांचा आक्रोश मोर्चा तहसीलवर धडकला

**चिमूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने ६ सप्टेंबर २०२३ रोजी शासन निर्णयाद्वारे राज्यातील सर्व शासकीय नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करुन बाह्य यंत्रणेमार्फत नोकर भरती करण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यातील ६२००० शाळा कार्पोरेट क्षेत्रातील खाजगी कंपन्यांना भौतीक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली १० वर्षांपर्यंत दत्तक देऊन छुप्या पद्धतीने खाजगीकरण करण्याचा डाव रचला आहे.

२० पटाच्या आतील शाळा समुहाच्या नावाखाली बंद करण्याचा घाट घातला आहे.सुशिक्षीत बेरोजगारांच्या आयुष्याची राखरांगोळी करणाऱ्या या शासननिर्णयाचा विरोध करण्यासाठी चिमूर तहसील कार्यालयावर तालुक्यातील ३० सामाजिक संघटना एकत्र येऊन आक्रोश मोर्चा नेण्यात आला.आक्रोश मोर्चा अभ्यंकर मैदान येथून निघून तहसील कार्यालयावर सांगता झाली.६ सप्टेंबरला निर्गमित केलेल्या कंत्राटीकरणाचा शासननिर्णय रद्द करण्यात यावा,१८ सप्टेंबरच्या शासननिर्णयाने राज्यातील ६५ हजार शाळांचे होणारे खाजगीकरण रद्द करण्यात यावे, २१ सप्टेंबर चा २० पटसंख्येच्या आतील शाळा बंद करुन त्यांचे समूह शाळांत रूपांतर करण्याचा शासननिर्णय रद्द करण्यात यावा या प्रमुख मागण्यासह सर्व पदांच्या शासकीय भरतीची जाहीरात एम.पी.एस.सी. मार्फत करण्यात यावी, संविधानात दिलेल्या आरक्षणानुसार भरतीच्या जाहीरातीमध्ये सर्वांना जागा देण्यात याव्या, सर्व पदांच्या परीक्षेची फी सर्वांकरिता १०० रु. ठेवण्यात यावी, तलाठी, वनरक्षक आदी परीक्षांकरीता घेतलेल्या १०००



रुपयामधुन ९०० रुपये परत करावे, परीक्षा घेण्याकरीता खाजगी कंपनींना कंत्राट देवू नये, परीक्षांत घोटाळा करणाऱ्यांना व्यक्तींना आजन्म कारावासाची शिक्षा देण्यात यावी, राज्यातील सर्व विद्यापीठांच्या सर्व सेमिस्टरची फी कमी करण्यात यावी, बिहार राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही सर्व जातींची जातनिहाय जनगणना करण्यात यावी, ओबीसी विद्यार्थ्यांची मागील ४ वर्षापासून थकीत शिष्यवृत्ती देण्यात यावी, सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्यात यावी, शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर देण्यात यावी, कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्यात याव्या, विद्यापीठाच्या चुकीच्या गुणदान पध्दतीने होणारे विद्यार्थ्यांचे नुकसान याबद्दल विभागीय चौकशी करावी, गोंडवाना विद्यापीठात झालेली बोगस प्राध्यापक भरती रद्द करावी, शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करावी व त्यांची मान्यता रद्द करावी, ओबीसींकरीता मान्यता दिलेली ७२ वस्तीगृहे आणि सावित्रीबाई फुले स्वाधार योजना सुरु करण्यात यावी आदी मागण्या आक्रोश मोर्चात करण्यात आल्या.निमंत्रक डॉ. महेश खानेकर, डॉ. आशिष पाटील,ना.रा.कांबळे,रामदास कामडी,सुरेश डांगे, रवी वरखेडे, सुनिल केळझरकर,अशोक वैद्य,प्रकाश कोडापे, रावण शेरकुरे,लहू पाटील,विनोद बारसागडे, वैभव ठाकरे, सुरक्षा अंबादे,साहिल तुमराम आदींनी मनोगत व्यक्त केले.या मोर्चात तालुक्यातील नागरिक, युवक युवती आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.संचालन सुरेश डांगे यांनी केले तर आभार अरुण गायकवाड यांनी मानले.दरम्यान विविध १८ मागण्यांचे निवेदन तहसीलदार प्राजक्ता बुरांडे यांना शाळा बचाव व कंत्राटीकरण, खाजगीकरण विरोधी कृती समिती व विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने दिले.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त वने व वन्य जीवांच्या संरक्षणाबाबत जनजागृती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एफडीसीएम, चिचपल्ली येथील वनपरीक्षेत्र कार्यालयाच्या वतीने १ ते ७ आक्टोबर २०२३ या कालावधीत वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्याने सदर सप्ताहात वने व वन्यजीवांचे संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. त्यासोबतच स्वच्छता अभियान देखील राबविण्यात आले. वन्यजीव सप्ताहाच्या समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन इकोपार्क, मूल येथे करण्यात आले होते. याप्रसंगी चिचपल्लीचे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) घोरुडे, वनपरिक्षेत्र अधिकारी सारंग बोथे, संजीवन पर्यावरण संस्थेचे प्रतिनिधी उमेशसिंग झिरे यांच्यासह इतर पर्यावरण संवर्धन संस्थांचे प्रतिनिधी, वनविभाग व एफडीसीएम विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.यावेळी, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिचपल्ली येथे शाळेतील शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरच्या सहाय्याने वन्यजीवाबंद्दल माहितीपट दाखविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वन्यजीवांची ओळख करुन देत त्यांचे महत्व पटवून देण्यात आले. त्यासोबतच गावातील लोकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने वनविभाग व एफडीसीएम च्या वतीने चिचपल्ली–अजयपुर–केळझर–जानाळा–मुल येथून मोटरसायकल रॅली काढण्यात आली. सदर रॅलीदरम्यान वन्यजीवांची सुरक्षा करण्याचे आवाहन करण्यात आले असून मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्याकरीता उपाययोजना सांगण्यात आल्या.नागरिकांनी वन्यजीव, पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी हातभार लावावा आणि मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभागास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला वनपरीक्षेत्र अधिकारी सारंग बोथे यांच्या मार्गदर्शनात कुमरे, चव्हाण, शिंदे, गवई, गव्हारे, सिंघन यांनी सहकार्य केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पदनियुक्ती सोहळा संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्रमिक पत्रकार भवन चंद्रपूर येथे राष्ट्रीय सचिव माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते व ग्रामीण जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजित पवार , राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने . विलास नेरकर यांच्यावर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वरोरा विधानसभा अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली. त्यामुळे वरोरा विधानसभा क्षेत्रात कार्यकर्ते मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तसेच वरोरा तालुकाध्यक्षपदी रविंद्र भोयर सरपंच ग्रामपंचायत येन्सा व वरोरा



शहराध्यक्षपदी चंद्रकांत कुंभारे यांची निवड करण्यात आली. भद्रावती तालुकाध्यक्षपदी राजू बोरकर भद्रावती, शहराध्यक्षपदी गितेश सातपुते यांची निवड करण्यात आली. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील प्रमुख नेते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागात शिवसेना ठाकरे गटाची होऊ द्या चर्चा मोहीम

## महेश केदारी यांचे पारंपरिक पद्धतीने ढोल ताशांनी केले स्वागत

**गडचिरोली । प्रतिनिधी**

अहेरी तालुक्यातील अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागातील जीमलगट्टा येथे महेश केदारी गडचिरोली जिल्हा संपर्कप्रमुख आणि रियाज शेख जिल्हाप्रमुख होऊ द्या चर्चा करूया बोलघेवड्या शासनाच्या भांडाफोड कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी स्थानिक गावकऱ्यांच्या वतीने आदिवासी पारंपारिक पद्धतीने ढोल ताशांनी नृत्य सादर करीत महेश केदारी गडचिरोली जिल्हा संपर्क प्रमुख यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश केदारी यांनी आपल्या भाषणात सांगितले,अहेरी विधानसभा क्षेत्राचा शून्य प्रमाणात विकास झालेला आहे, केंद्र सरकार व राज्य सरकार केवळ कागदावर गडचिरोली जिल्ह्याच्या विकास झाल्याचे प्रसिद्धी च्या माध्यमाने प्रचार व प्रसार करीत आहे.

गडचिरोली जिल्ह्यात अनेक प्रश्न असतानाही खासदार–आमदार यांनी ज्याप्रमाणे जनतेची मूलभूत प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरलेल्या लोकप्रतिनिधींच्या निष्क्रिय कार्यामुळे जनतेच्या हाल बेहाल झालेला आहे, खेड्यापाड्यात कोणत्याही योजनाच्या लाभ मिळत नाही, लाभार्थ्यांना शासन योजनेचे नावे सुद्धा माहित नाही. असे खोटारड्या योजनांच्या विरोधात महेश केदारी यांनी जोरदार प्रहार केले.स्थानिक मुद्द्यावर म्हणाले जिमलगट्टा तालुक्याची मागणी अनेक वर्षापासून होत असताना सुद्धा आज पर्यंत जिमलगट्ट्याला तालुक्याच्या दर्जा देण्यात आला नाही.रस्ते नाही पिण्याचे पाण्याची सोय नाही, दर्जेदार शिक्षण नाही. विद्युत पुरवठा वारंवार बंद होत असते. रुग्णालयाची सोय नाही.रुग्णालय असेल तर तिथं डॉक्टर नाही, मुख्यालयावर कर्मचारी अधिकारी वर्ग उपस्थित राहत नाही, असे अनेक प्रश्नावर संताप व्यक्त करीत महेश केदार यांनी शासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत हल्लाबोल केले.यावेळी या कार्यक्रमात जिल्हाप्रमुख रियाज शेख यांनी सांगितले की जोपर्यंत जनतेने जन आंदोलन उभारत





नाही तोपर्यंत शासन झोपेतून उठणार नाही म्हणून मा श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेला आदेश दिलेले आहे महाराष्ट्र राज्यात होऊ द्या चर्चेच्या माध्यमातून प्रत्येक खेड्यापाड्यात जाऊन जनतेची संवाद साधून कागदावर राबवीत असलेल्या बोल बच्चन योजनेच्या विरोधात पोल खोल कार्यक्रम घेण्यात येत आहे. या कार्यक्रमात जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून राहिले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने झोपलेली सरकार चे डोळे उघडण्यासाठी गावागावात जाऊन होऊ द्या चर्चा राबविण्यात येईल असे आव्हान शिवसेना जिल्हाप्रमुख रियाज शेख यांनी यावेळी जाहीर केले.अक्षय पुंगाटी प्रास्ताविक मार्गदर्शन केले. होऊ द्या चर्चा या कार्यक्रमात प्रफुल एरणे अहेरी तालुकाप्रमुख,मनीष दुर्गे एटापल्ली तालुकाप्रमुख, अक्षय पुंगाटी युवा सेना तालुकाप्रमुख, तुळजा तलांडे युती सेना जिल्हा अध्यक्ष, सपना ईश्वरकर, तालुका संघटिका आयान पठाण, शहर प्रमुख अक्षय कुडमेते, उपशहर प्रमुख आलापल्ली जहीर शेख, जिमलगट्टा सर्कल प्रमुख अनिल आत्राम, विभाग प्रमुख वसंत कन्नाके, उपविभाग प्रमुख संतोष आत्राम, उपविभाग प्रमुख बबलू शेख,शाखाप्रमुख नागेश उपला, उपशाखाप्रमुख लक्ष्मी सोया,विभाग प्रमुख मिसाळ, विभाग प्रमुख प्रियंका वेलादी, उप विभाग प्रमुख आकाश गणपत नेताम, दीपक तोरण,संदीप आत्राम, योगेश मडावी, आकाश मडावी, रोहित आत्राम,आदी शिवसैनिक पदाधिकारी या कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .